

# गणेशोत्सव २०१५

**विषय :- गणेशोत्सव तयारीचे चेक लिस्ट बाबत...**

चालु वर्षी शुक्रवार दिनांक १७/०९/२०१५ ते सोमवार दिनांक २७/०९/२०१५ या कालावधीत गणेश उत्सव साजरा होणार आहे. यासाठी करण्यात येणा-या तयारीचा आढावा घेण्यासाठी खालील प्रमाणे चेक लिस्ट देण्यात येत आहे.

- **गणपती उत्सवापुर्वी करावयाची तयारी**

१. प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी मागील पाच वर्षात दाखल झालेले दुखापतीचे, आर्म ॲक्टचे गुन्हे, गुंड रजिस्टर वरील गुन्हेगारांची यादी करून त्यांचेवर कोणत्या प्रकारची कार्यवाही करावयाची हे ठरवून घेणे. (उदा.सी.आर.पी.सी. कलम १०७, ११०, १५१, १५१(३), १४९, मु.पो.ॲक्ट कलम ९३, एम.पी.डी.ए. इत्यादी.)

२. घातपात होणार नाही यासाठी लोकांना प्रबोधन करण्यासाठी सुचनांचे फ्लेक्स बोर्ड तयार करून ते महत्वाच्या ठिकाणी लावणे.

३. शांतता समिती, पोलीस मित्र समिती(मोहल्ला समिती), गणेश मंडळांच्या बैठका घेणे.

४. गणेश मंडळांना डी. एफ. एम. डी., एच. एच. एम. डी. तसेच सी. सी. टि. व्ही. कॅमेरे लावण्यासाठी प्रोत्साहन देवून मार्गदर्शन करणे.

५. विशेष पोलीस अधिकारी म्हणून नेमता येईल अशा स्वयंसेवकांची यादी तयार करणे.
अ) एन.सी.सी. ब) एन.एस.एस. क) विविध स्पोर्ट्स क्लब
(कब्बड्डी/क्रिकेट/हॉलीबॉल/हॉकी/कुस्ती इ.)

६. पोलीस ठाण्याचे हद्दीतील सर्व शस्त्र परवाना धारकांची शस्त्र तपासणी करून शस्त्र परवाना नुतनीकरण झाले आहे किंवा नाही याची खात्री करून कारवाई करावी.

७. अग्नीशस्त्रांची विक्री करणा-या दुकानांच्या परवान्यांची तपासणी करणे.

८. घातपात होणार नाही या साठी गणेश मंडळांच्या बैठका घेवून बी.डी.डी.एस. पथकांमार्फत जागरूकता निर्माण करणे

९. महानगरपालिका, पी.एम.पी.एम.एल, प्रादेशिक परिवहन अधिकारी, गृह रक्षक दल, नागरी संरक्षण दल, एम.एस.ई.बी. इत्यादी खात्याच्या अधिका-यां सोबत बैठका घेवून समन्वय प्रस्तापित करणे.

१०. जातीय दंगा काबु योजनेच्या रंगीत तालीम घेणे.

११. गणेशोत्सव बंदोबस्तासाठी पोलीस ठाण्यामध्ये लाठया, हेल्मेट, अश्रुधुर, अग्नीशस्त्रे, ढाली, दारूगोळा, मोठे दोर, बॅटरी इत्यादींची तपासणी करून ते वापरासाठी योग्य व पुरेसे आहेत काय? याची खात्री करावी.

१२. पोलीस वाहनांवरील लोखंडी जाळया व ध्वनीक्षेपक यंत्रणा सुस्थितीत आहे किंवा नाही याची खात्री करावी.

१३. डॉल्बी सिस्टीम,स्पिकर,बँड व ढोल-लेझीम, झांज पथक इत्यादी भाडयाने देणा- यांची बैठक घेवून ध्वनी प्रदूषण कायदयातील तरतूदी समजावून सांगाव्यात. मा. सर्वोच्चन्यायालयाने ध्वनीक्षेपक व वाद्ये वाजविण्यांसबधी दिलेल्या निर्देशांची माहिती सांगून त्यातील नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास सांगावे.

१४. मांडववाले,इलेक्ट्रिशियन, गुलाल व गणपती मुर्ती विक्रेत्यांची बैठक घेवून त्यांना सुचना द्याव्यात.

१५. दारू,जुगार,लॉटरी इ. अवैद्य धंदयाविरूध्द परिणामकारक कारवाई करून ते समूळ नष्ट करावे.

१६. ध्वनी मापक यंत्र (Noise level Meter) वापर करून त्याचा ध्वनी प्रदूषण मोजण्यासाठी उपयोग करावा.

१७. स्पोटक पदार्थ, फटाके विक्री करणा-या दुकानांचे परवाने व साठे तपासावेत.

## ● <u>गणेशोत्सव काळात करावयाची तयारी</u>

१. गणेश मंडळाने पोलीस,महानगरपालिकाची,छावणी परिषदेची, परवानगी घेतली का? ते पाहणे.

२. गणेश मंडळाची धर्मदाय आयुक्ताकडे नोंदणी केली किंवा नाही याची माहिती घेणे.

३. गणेश मुर्ती ठेवण्यात येणारे मंडप ऊन, वारा व पाऊस यापासून नुकसान होणार नाही या दृष्टीने मंडप मजबूत व सुरक्षित आहे किंवा नाही ते पहावे.

४. गणेश मंडपामध्ये अग्निशमन व्यवस्था केली आहे काय? हे पाहणे. उदा. वाळू, पाणी यांनी भरलेल्या बादल्या, छोटे अग्निशमन यंत्र इत्यादी.

५. मंडपात भाविकांना जाण्यायेण्यासाठी पुरेसा रूंद मार्ग ठेवला आहे का? ते पाहणे.

६. गणेश मंडळाच्या पदाधिका-यांनी नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी पुरूष व महिला स्वयंसेवक नेमले आहेत का? त्यांना ओळखपत्र देण्यात आले आहेत काय? ते पहावे.

७. गणेश मंडळांच्या पदाधिका-यांनी मंडपाच्या व मुर्तीच्या संरक्षणासाठी काय व्यवस्था केली आहे? ते पहावे

८. गणेश मंडळाने कायदेशीररित्या विद्युत कनेक्शन घेतले आहे काय? विद्युत कनेक्शन सुरक्षिततेच्या दृष्टीने परिपुर्ण आहे काय? याची खात्री कराणे.

९. गणेश मंडळातर्फे तयार करण्यात येणारे देखावे तपासून आक्षेपार्ह देखावे याबद्दल कारवाई करणे.

१०. गणेश मंडळांच्या पदाधिका-यांकडून गणेशोत्सवाच्या काळात सादर करण्यात येणा-या कार्यक्रमाची आगाऊ माहिती घेणे.

११. गणेश मंडळांना मा.मंत्री महोदय, लोक प्रतिनिधी, सिने कलावंत, व्ही.आय.पी.व्यक्ती भेट देणार असतील तर त्याची माहिती घेणे.

१२. जबरदस्तीने वर्गणी गोळा करून धमक्या देणा-यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करणे.

१३. गणपती मंडळाचे ठिकाणी बंदोबस्त व पेट्रोलिंग ठेवणे.

१४. प्रत्येक गणेश मंडळाचे ठिकाणी व्हिजीट डायरी ठेवावी.

१५. हॉटेल, लॉज, धर्मशाळा चेक करून संशयीत मिळून आल्यास कारवाई करावी.

१६. रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड, रिक्षा स्टॅन्ड, टॅक्सी स्टॅन्ड येथील जाणा-या येणा-या संशयीताच्या हालचाली लक्ष ठेवावे.

१७. कॉईन बॉक्स, एस.टी.डी.बुथ येथील संशयीतांचे हालचालींवर लक्ष ठेवणे.

१८. भटकी जनावरे व प्राणी यांचा वेळीच बंदोबस्त करणे.

१९. गणेशोत्सव काळात जास्तीत जास्त अधिकारी व कर्मचारी गणवेशात लाठी, हेल्मेट व शस्त्रासह हजर राहतील.

२०. गणेश मंडळांना भेटी देण्यासाठी गणेश उत्सव काळात स्वतंत्र **"गणेश गुड मॉर्निग स्कॉड"** नेमावा. त्यामध्ये माहितगार अधिकारी व कर्मचारी नेमावेत.

२१. गणेश मंडळांनी गणपती पाहण्यास येणा-या महिला व पुरुष भाविकांच्या स्वतंत्र रांगा लावाव्यात

२२. गणपती मंडळाजवळ ५० मीटर चे आत कोणतीही वाहने पार्क होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

२३. गणपती मंडळाचे आजुबाजुस किंवा मुर्तीजवळ बेवारस वस्तु ठेवली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

**<u>गणेश विसर्जन मिरवणुकीसंदर्भात करावयाची तयारी चेकलिस्ट :-</u>**

१. आपल्या पोलीस ठाणे हद्दीतील विविध गणेश मंडळानी गणेशोत्सव मिरवणुक

२. परवानगी घेतली आहे काय ?त्याचा मिरवणुकीचा मार्ग व वेळ ठरवून देण्यात आली आहे काय ?

३. मिरवणुक मार्गावरील खड्डे बुजविण्यात आलेले आहेत काय ?

४. मिरवणुक मार्गावरील दगड, विटा बांधकामाचे साहित्य इत्यादी उचलून घेतले आहे काय ?

५. मिरवणुक मार्गावरील विद्युत दिवे (स्ट्रिट लाईट) चालू स्थितीत आहेत काय? नसल्यास संबधित खात्याकरवी त्यांची दुरूस्ती करून घेण्यात यावी.

६. मिरवणुकीत सामील होणा-या वाहनांची प्रादेशिक परिवहन अधिका-यांमार्फत (आर.टी.ओ.) तपासणी करून घेण्यात यावी.

७. मिरवणुक मार्गावर महत्वाच्या चौकात "वॉच टॉवर" उभारण्यात यावेत व त्यावरून गर्दीवर देखरेख ठेवणेसाठी सशस्त्र कर्मचारी नेमावेत. त्यांचेवर हत्यार तसेच दुर्बिन देण्यात यावी.

८. मिरवणुक मार्गावरील सर्व उंच इमारतींच्या छतांची तपासणी करण्यात यावी व छतावर दगड, विटा, सोडावॉटरच्या बाटल्या इत्यादी प्रकारचे आक्षेपार्ह साहित्य रहाणार नाही या बाबत खबरदारी घ्यावी.

९. मिरवणुक मार्गावर महत्वाच्या चौकामध्ये जनरेटरची व्यवस्था करुन घ्यावी. मिरवणुक मार्गावर उभारण्यात येणा-या स्वागत कक्षास पोलीसांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१०. मिरवणुक मार्गात उभारण्यात येणा-या स्वागत कक्षामुळे मिरवणुकीला अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

११. गणेश मंडळानी केलेल्या मुर्तीच्या आरासमुळे अडथळा होणार नाही अशा प्रकारे विद्युत, टेलिफोन तारा, केबल, केबल वायर यांची उंची किमान १६ फुटापेक्षा वर असेल याची मिरवणुकीच्या मार्गावर पाहणी करून खात्री करावी. इत्यादीमुळे मिरवणुकीला अडथळा निर्माण होतो. अशा प्रकारच्या विदयुत तारा, वायर्स उंच खेचुन घेण्याबाबत कारवाई करुन घेण्यात यावी

१२. मिरवणुक मार्गावर पार्क करण्यात आलेली वाहने, बेवारस वाहने, संशयित वाहने उभी राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी व ती वेळीच हटविण्यात यावी. तसेच मिरवणुक मार्गाचे समांतर रस्त्यावर देखील वाहनातून अथवा पायी गस्त ठेवण्यात यावी.

१३. मिरवणुक मार्गावर महत्वाच्या चौकामध्ये शांतता समिती व पोलीस मित्र समिती (मोहल्ला समिती) चे सदस्य नेमण्यात यावे. त्यांना मिरवणुक मार्गावरील ठराविक सेक्टर नेमून देण्यात यावे. त्याबाबत त्यांना लेखी कळवावे.

१४. मिरवणुक मार्गावरील मशिदी, दर्गे व इतर प्रार्थना स्थळे यांना योग्य ते संरक्षण पुरविण्यात यावे. त्या ठिकाणी अनुभवी व जाणकार अधिकारी तसेच कर्मचारी नेमण्यात यावेत. सदर ठिकाणी पुरविण्यात येणा-या बंदोबस्त व्यवस्थे बद्दल स्थानिक मुस्लीम बांधवाना विश्वासात घेवून त्यांचे सहकार्य घेण्यात यावे.

१५. मिरवणुक चालू असताना मार्गावरील मशिदीमध्ये कोठेही जमाव जमणार नाही व कोणत्याही प्रकारे आक्षेपार्ह घटना घडणार नाही याची दक्षता घ्यावी.

१६. मिरवणुक मार्गावरील संवेदनशिल ठिकाणी व महत्वाचे ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात यावा. तसेच मिरवणुक मार्गाला समांतर असणा-या रस्त्यावर/गल्ली बोळात बंदोबस्त नेमावा.

१७. मिरवणुक मार्गावर महत्वाच्या ठिकाणी प्रथमोचार करण्यासाठी वैद्यकीय पथक व रुग्णवाहिका यांची व्यवस्था करण्यात यावी.

१८. विसर्जन मार्गावर उभारण्यात येणा-या स्वागत कक्षांची संख्या मर्यादीत असावी. स्वागत कक्षाच्या स्टेजमुळे मिरवणुकीला अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१९. स्वागत कक्षावरील ध्वनीक्षेपकामुळे मोठया प्रमाणांवर ध्वनी प्रदुषण होते व त्याचा बंदोबस्तावरील अंमलदारांना खुप त्रास होतो. ध्वनी प्रदुषणामुळे मिरवणुकीचे नियंत्रण करणे अवघड होते. तसे होवू नये याची खबरदारी घ्यावी.

२०. स्वागत कक्षावरील ध्वनी क्षेपकावरुन गणेश विसर्जन संबधी मंडळानां मार्गदर्शन सुचना देण्यात याव्यात. ध्वनीक्षेपकाचा उपयोग भाषणे करण्यासाठी मोठया आवाजात गाणे म्हणण्यासाठी तसेच इतर पक्ष, संघटना यांच्या बद्दल वक्तव्य करण्यासाठी होवू नये याची खबरदारी घ्यावी.

२१. यापुर्वी देशात वेगवेगळया ठिकाणी घडलेल्या बॉम्बस्फोटाच्या घटना लक्षात घेवून सर्व नागरिकांना व गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांना योग्य त्या सुचना दयाव्यात व त्यांना संभाव्या धोक्याबद्दल/ अतिरेक्यांच्या कारवाई बद्दल सतत जागरुक राहण्यास सांगावे.

२२. मुख्य मिरवणुक मार्गाच्या लगत असलेल्या रस्त्यावरील वाहतुक थांबविण्यासाठी/ वळविण्यासाठी किंवा पर्यायी वाहतुक मार्ग याची आवश्यक ती व्यवस्था करण्यात यावी. रस्त्यात आवश्यकते प्रमाणे बॅरिकॅटस लावण्यात याव्यात.

२३. विसर्जनाच्या ठिकाणी योग्य अंतरावर आवश्यक ते बॅरिकेडींग व लायटिंगची व्यवस्था करून घेण्यात यावी.

२४. विसर्जनाच्या ठिकाणी पोहणा-या लोकांचे व सुरक्षा रक्षकांचे पथक तैनात करण्यात यावे. त्यांना ओळखण्यासाठी एका ठराविक साच्याचे रंगीत टि शर्ट पुरविण्यात यावेत.

२५. सुरक्षा रक्षकांना लाईफ जॅकेट पुरविण्याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच विसर्जनाच्या ठिकाणी आवश्यकते प्रमाणे बोटी कींवा नावेची व्यवस्था करण्यात यावी.

२६. विसर्जनाच्या ठिकाणी पुरेशी प्रकाश योजना, विद्युत योजना (फ्लड लाईटस्) व जनरेटरची व्यवस्था करण्यात यावी.

२७. विसर्जनाच्या ठिकाणी टेहळणी करण्यासाठी वॉच टॉवर बांधण्यात यावेत व त्याचेवर हत्यारी कर्मचारी दुर्बिणीसह नेमण्यात यावेत.

२८. विसर्जनाच्या मिरवणुकीचे वेळेस काही गणेश मंडळांची वाहने नादुरुस्त झाल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होतो अशी वाहने बाजुला काढण्यासाठी क्रेनची व्यवस्था करण्यात यावी.

२९. विसर्जन करण्यासाठी लहान मुले तसेच मंडळाचे कार्यकर्ते खोल पाण्यात जाणार नाहीत याबद्दल खबरदारी घ्यावी.

३०. गणपती विसर्जन करणा-या मंडळाची वाहने परत जाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

३१. गणेश विसर्जन मिरवणुक संपेपर्यत व सर्व मंडळाची वाहने व कार्यकर्ते आपआपले ठिकाणी परत जाईपर्यत मिरवणुक मार्गावरील बंदोबस्ताचे अधिका-यांनी व कर्मचा-यांनी आपले सेक्टरमध्ये थांबुन रहावे आपली जागा किंवा सेक्टर सोडू नयेत.

३२. वेगवेगळया पक्षाशी संबधीत गणेश मंडळे विसर्जन मिरवणुकीत एकामागे एक आल्यास किंवा जवळजवळ आल्यास पुढे जाण्यावरून किंवा एकाच ठिकाणी जास्त काळ नाचण्यावरून अशा मंडळामध्ये वाद निर्माण होवु शकतो. अशा गणेश मंडळांना एकमेकांपासुन दुर ठेवण्यात यावे.

३३. मिरवणूकीमध्ये प्राण्यांचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३४. गणेशोत्सव काळात एखादी अनुचित घटना/गंभीर घटना घडल्यास/आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास परिस्थीती कशी हाताळावी/ कोणती उपाय योजना करावी. या बद्दल विचारपुर्वक योजना तयार करावी व त्याबद्दल सर्व अधिकारी/कर्मचारी यांना ब्रिफिंग करावे.

३५. गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीसाठी दिड दिवसाचे विसर्जन, ५ दिवसाचे विसर्जन, ७ दिवसाचे विसर्जन व १० दिवसाचे विसर्जन यासाठी स्वतंत्रपणे बंदोबस्त काढण्यात यावा. सर्व कर्मचारी व अंमलदारांना बंदोबस्ताच्या सुचना व्यवस्थीत समजावुन सांगाव्यात. (ब्रिफिंग व डीब्रिफिंग करावी.)

३६. गणेशोत्सव काळात आलेले चांगले वाईट अनुभव, त्रुटी व उणीवा, सुचना इत्यादी उदा.
अ) गणेशोत्सवा पुर्वी करावयाची तयारी, ब) गणेशोत्सव काळात करावयाची तयारी,
क) गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत करावयाची तयारी या बाबतचा पूर्तता अहवाल या कार्यालयास पाठवावा.